जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: १ नोव्हेंबर, २०२२

जळगाव दि.१ (प्रतिनिधी) महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाच्या सदस्यांनी मंगळवार दि.१ नोव्हेंबर रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठास भेट देऊन शिक्षक व शिक्षकेतर पदांचा आरक्षणाबाबत आढावा घेतला.

राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य डॉ.गोविंद काळे, डॉ.गजानन खराटे, डॉ.नीलिमा सरप, अॅड बी.एल. किल्लारीकर या चार सदस्यांनी मंगळवारी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात बैठक घेतली. यावेळी कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, उच्च शिक्षण जळगाव विभागाचे सहसंचाल डॉ.संतोष चव्हाण, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त योगेश पाटील, उपजिल्हाधिकारी, मागासवर्ग आयोगाचे कार्यालयीन अधिक्षक राजेश वाघ, उपकुलसचिव ए.सी.मनोरे, जी.एन.पवार, सहायक कुलसचिव देवेंद्र जगताप, एन.जी. पाटील, कक्ष अधिकारी जयश्री शिंगारे, डी.बी. बागले, सहसंचालक कार्यालयाचे अधिकारी राठोड आदी उपस्थित होते.

शैक्षणिक संस्थांमध्ये मागासवर्ग प्रवर्गाच्या आरक्षणाची अंमलबजावणी केली जात आहे की नाही, या प्रवर्गातील रिक्त पदे, विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीबद्दलच्या अडचणी या बाबतची विद्यापीठ व महाविद्यालयांमधील माहिती आयोगाच्या सदस्यांनी जाणून घेतली. प्रथमच या पध्दतीची आढावा बैठक घेतली जात असून वर्षातून एकदा अथवा दोनदा आयोगाकडून विधी मंडळाला याबाबतचा अहवाल दिला जात असतो. यामागे सामाजिक न्याय पाळला जातो की नाही ही भूमिका असल्याची माहिती अॅड. किल्लारीकर व डॉ.गोविंद काळे यांनी दिली. कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी विद्यापीठ व महाविद्यालयातील मंजूर व रिक्त पदे, त्यातील आरक्षण याबाबतची संविस्तर माहिती सदस्यांना दिली. कुलगुरु प्रा.माहेश्वरी यांनी देखील सदस्यांच्या शंकांचे निरसन केले. सदस्यांनी विद्यापीठ, सहसंचालक व समाजकल्याण विभागाला काही सूचना केल्या.

---

## बातमी क्र. २

जळगाव दि.१ (प्रतिनिधी) दैनंदिन जीवनात जगत असतांना स्त्री-पुरुष व पती पत्नी यांच्यातील संवाद व परस्परांतील ताळमेळ व्यवस्थित असेल तर तुमचे जीवन सुकर होईल असे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार सेवा विभागाच्यावतीने आयोजित व्याख्यानमालेत एकविसाव्या शतकात स्त्री-पुरुष सहजीवन या विषयावर बोलतांना वक्ते रवींद्र पंढरीनाथ म्हणाले.

खान्देशकन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी व्याख्यानमालेत रवींद्र पंढरीनाथ यांच्या व्याख्यानाचे आयोजन दि.३१ ऑक्टोबर रोजी करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, एकत्र कुटुंबपध्दती संपुष्टात येत असल्याने व थोडया फार प्रमाणात सोशल मिडीयामुळे एकमेकांतील संवाद संपत चालला आहे. स्त्री-पुरुष परस्परांचे शत्रू नसून ते दोघे एकत्र आल्याशिवाय जीवन सुकर होवूच शकत नाही. प्रेमविवाह करण्याचे प्रमाण पूर्वी ४ टक्के

होते आता ते प्रमाण २०टक्क्यापर्यंत गेल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेच्या संचालक प्रा.मधुलिका सोनवणे हया अध्यक्षस्थानी होत्या. प्रा.सोनवणे म्हणाल्या की, कुटुंब स्थिर ठेवायचे असेत व प्रगती करायची असेल तर परस्परातील संवाद गरजेचा आहे. प्रास्ताविक विभागाचे संचालक प्रा.आशुतोष पाटील यांनी केले. पाहुण्यांचा परिचय वर्षा परदेशी हिने तर सूत्रसंचालन जितेंद्र राठोड याने केले. आभार यश पानपाटील यानी मानले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी